सातारा, बुधवार, १७ जानेवारी २०१८ । किंमत ₹ ४

पुणे। कोल्हापूर। नाशिक। मुंबई। औरंगाबाद। सोलापूर। नागपूर। सातारा। जळगाव। नांदेड। अकोला येथून प्रसिद्ध

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव



भोसे (ता. कोरेगाव) : श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना प्रेरणा कट्टे. शेजारी डॉ. विजयसिंह सावंत, जयश्री फाळके.

# विशेष श्रमसंस्कार शिबिरे सामाजिक सलोख्यास पूरक

## प्रेरणा कट्टे; भोसेत भोसले कॉलेजच्या शिबिराचा समारोप

**कोरेगाव, ता. १६ :** श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थी श्रम, सेवा, प्रबोधनाद्वारे प्रत्येक समाज घटकाला जोडण्याचे काम करत आहेत. त्यातून परस्परांविषयी निर्माण होणारा आदर, प्रस्थापित होणारा सामाजिक सलोखा या बाबी समाजाला सक्षम बनविण्यासाठी पूरक आहेत, असे प्रतिपादन पोलिस उपअधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी केले.

भोसे (ता. कोरेगाव) येथे डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होता. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते. याप्रसंगी जिल्हा परीषदेच्या सदस्या जयश्री फाळके, सरपंच अजित माने आदी उपस्थित होते. डॉ. सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. प्रकल्प अधिकारी प्रा. डी. डी. पाटील, प्रा. नीलेश गोसावी, प्रा. प्रदीप पवार, उत्कृष्ट स्वयंसेवक आकाश सरिक, सागर पवार, उत्कृष्ट स्वयंसेविका स्नेहल इंगवले, ऋतुजा बोधे, पैलवान माने यांचा विशेष सत्कार झाला. प्रा. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. गोसावी यांनी अहवाल वाचन केले. डॉ. सतीश सायकर, प्रा. एन. डी. बर्गे यांनी सूत्रसंचालन केले. प्रकल्प अधिकारी प्रदीप पवार यांनी आभार मानले.